# ६४ वर्षांच्या इतिहासात सातव्या महिला सभापती म्हणून अर्चना जाधव यांची निवड

## परंडा पंचायत समितीमध्ये सभापती व उपसभापती शिवसेनेचे

आरंभ मराठी । परंडा

परंडा पंचायत समितीच्या सभापतीपदी अर्चना अण्णासाहेब जाधव तर उपसभापतीपदी परसू चंद्रकांत गवारे यांची निवड करण्यात आली. पंचायत समितीच्या सभागृहात शुक्रवारी पार पडलेल्या निवड प्रक्रियेत दोन्ही पदांसाठी एकास एक लढत झाली. त्यामध्ये सभापतीपदासाठी भाजपकडून मोनिका पाटील यांनी अर्ज दाखल केला होता.

पिठासन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील (मांजरा प्रकल्प) यांनी काम पाहिले.परंडा पंचायत समितीत एकूण १० सदस्य आहेत. त्यापैकी शिवसेनेचे (शिंदे गट) ६ सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेसचे २, उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेचा १ सदस्य आणि भाजपचा १ सदस्य असे सदस्य निवडून आले आहेत. शिवसेनेकडे स्पष्ट बहुमत असल्यामुळे सभापती व उपसभापतीपदाची निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडली. सभापतीपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असल्यामुळे या पदासाठी मोठी उत्सुकता आणि राजकीय चुरस निर्माण झाली होती. अखेरीस शिवसेनेचे नेते व माजी मंत्री तानाजी सावंत यांचे निष्ठावंत कार्यकर्ते अण्णासाहेब जाधव यांच्या पत्नी अर्चना अण्णासाहेब जाधव यांना सभापतीपदाची संधी देण्यात आली. तर उपसभापतीपदी परसू चंद्रकांत गवारे यांची निवड करण्यात आली. पंचायत समितीच्या तब्बल ६४ वर्षांच्या इतिहासात केवळ सातव्यांदाच महिला सभापती पदावर विराजमान झाल्या आहेत. त्यामुळे अर्चना जाधव यांच्या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.







### आजपर्यंतच्या महिला सभापती

परंडा पंचायत समितीत १९९७ साली भाजपच्या डॉ. शारदा मोरे या पहिल्या महिला सभापती झाल्या होत्या. त्यानंतर १९९८ मध्ये शिवसेनेच्या शकुंतला सुरवसे यांनी दुसऱ्यांदा हा मान मिळवला. २००५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कल्पना शिंदे या तिसऱ्या महिला सभापती झाल्या. २०१२ मध्ये शिवसेनेच्या काशीबाई इथापे यांनी चौथ्या महिला सभापतीपदाचा मान पटकावला. २०१६ मध्ये प्रणिता मोरे या पाचव्या महिला सभापती झाल्या, तर २०१९ मध्ये शेळगाव गटातून अनुजा दैन यांनी एक वर्षासाठी सभापती पदाची धुरा सांभाळली. गेल्या चार वर्षांपासून परंडा पंचायत समितीवर प्रशासक होते. फेब्रुवारी महिन्यात झालेल्या निवडणुकीनंतर सभापती पद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाले. यावेळी वडनेर गणातून निवडून आलेल्या अर्चना अण्णासाहेब जाधव यांनी सातव्या महिला सभापती होण्याचा मान पटकावला आहे.

### परसू गवारे यांना उपसभापतीपदाची जबाबदारी

जवळा निजाम गटातून परसू चंद्रकांत गवारे यांनी पंचायत समिती निवडणुकीतविजयमिळवलाहोता.जवळासर्कलमधूनजिल्हापरिषदेसाठी धनंजय सावंत अपक्ष म्हणून निवडून आले आहेत. या भागात शिवसेनेची ताकद टिकून राहावी या दृष्टीने गवारे यांना उपसभापतीपदाची जबाबदारी देण्यात आल्याचे बोलले जात आहे. जवळा सर्कल हा परंडा तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा भाग मानला जात असल्यामुळे सर्व पक्षांचे या भागाकडे विशेष लक्ष असते. ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी आपण तत्पर राहणार असल्याचे गवारे यांनी यावेळी सांगितले.

### निष्ठावंत शिलेदाराला सभापतीपदाचा मान

अण्णासाहेब जाधव हे माजी मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांचे निष्ठावंत शिलेदार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याची दखल घेत सावंत यांनी अर्चना जाधव यांना सभापतीपदाची संधी देत जाधव कुटुंबाचा सन्मानकेलाआहे.त्यामुळेअण्णासाहेबजाधवयांचीपरंडातालुक्यातील राजकीय ताकद अधिक बळकट झाल्याचे मानले जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाजयंती महोत्सवासाठी नियोजन बैठक उत्साहात



आरंभ मराठी । धाराशिव

फुले, शाहू, आंबेडकर सेवाभावी संस्था संचलित फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'महाजयंती महोत्सव २०२६' संदर्भात नियोजन बैठक पार पडली. यावेळी दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. आज स्वच्छता अभियान, उद्यापासून देखावा उभारणी, ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व दिव्यांग मेळावा, १३ एप्रिल रोजी शासकीय योजनांचा मेळावा, तर १४ एप्रिल रोजी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, भोजनदान व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष गणेश वाघमारे यांनी दिली. बैठकीस अध्यक्ष गणेश रानबा वाघमारे, उपाध्यक्ष संजय गजधने, सचिव प्रवीण जगताप, सहसचिव संग्राम बनसोडे, कोषाध्यक्ष अंकुश उबाळे यांच्यासह मार्गदर्शक सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोहारा पंचायत समितीच्या सभापतीपदी पल्लवी जानकर

## उपसभापती अमोल पाटील यांची बिनविरोध निवड



आरंभ मराठी । लोहारा

लोहारा पंचायत समितीवर शिंदे गटाच्या शिवसेनेचे वर्चस्व कायम राहिले असून सभापतीपदी पल्लवी दादासाहेब जानकर तर उपसभापतीपदी अमोल पांडुरंग पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमागे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांचे राजकीय कौशल्य ठळकपणे दिसून आले. लोहारा पंचायत समितीतील सभापती पद हे नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित होते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतर्फे आणि माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पल्लवी दादासाहेब जानकर यांची उमेदवारी देण्यात आली होती. तर उपसभापती पदासाठी अमोल पांडुरंग पाटील यांची निवड करण्यात आली.पंचायत समिती निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. या निवडणुकीत भाजपचे ३, शिवसेनेचे ४ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा १ सदस्य असा आकडा होता. त्यामुळे सभापती पदासाठी चुरस निर्माण झाली होती. सभापती पदासाठी शिवसेनेकडून पल्लवी महादेव जानकर या इच्छुक होत्या, तर भाजपकडून दत्तात्रय आप्पाराव वाघमारे हे इच्छुक होते. दोन्ही पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर राजकीय हालचाली सुरू होत्या. बैठका, चर्चा आणि जुळवाजुळव सुरू होती. अखेरीस शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशी जुळवाजुळव करून बहुमताचा ५ चा आकडा गाठला. या राजकीय समीकरणात शिवसेनेला यश मिळाल्याने पल्लवी दादासाहेब जानकर यांची सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. तर अमोल पांडुरंग पाटील यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

# महिला दिनी HPV लसीकरण मोहिमेचा शुभारंभ होणार

## गर्भाशय मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी मुलींना मोफत लस

**धाराशिव** :- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते HPV (Human Papilloma Virus) लसीकरण मोहिमेचा देशव्यापी शुभारंभ करण्यात आला.या अनुषंगाने महाराष्ट्रातही दिनांक ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणार आहे. भारत सरकार व महाराष्ट्र राज्य आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला (Cervical Cancer) प्रतिबंध करण्यासाठी ही HPV लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर कर्करोगांपैकी गर्भाशय मुखाचा कर्करोग हा एक प्रमुख आजार असून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून HPV लसीकरण प्रभावी ठरते. या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यात ही मोहीम प्रारंभी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी राबविण्यात येणार असून त्यानंतर HPV लसीकरणाचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमात करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत वय वर्षे १४ ते १५ या वयोगटातील मुलींना HPV लस मोफत देण्यात येणार आहे. GARDASIL-4 (Quadrivalent) ही लस पूर्णपणे सुरक्षित असून जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांनी प्रमाणित केलेली आहे. या लसीचा ०.५ मिली इतका सिंगल डोस स्नायूमध्ये (IM) डाव्या हाताच्या वरच्या भागात देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये ही लस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र,ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय,जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचा समावेश असून या सर्व ठिकाणी लाभार्थींना लस पूर्णपणे मोफत दिली जाणार आहे. मध्यम किंवा तीव्र आजार असलेल्या मुलींनी पूर्णपणे बरे होईपर्यंत HPV लस घेऊ नये.मागील लसीकरणामुळे एलर्जी रिॲक्शन आलेली असेल किंवा यीस्ट (Yeast) ची ॲलर्जी असल्यास लस घेऊ नये. गर्भावस्था असल्यास HPV लस घेऊ नये. अपेक्षित वयोगटाबाहेरील मुलींना ही लस देण्यात येणार नाही.तसेच ज्यांना यापूर्वी HPV लस देण्यात आलेली आहे,त्यांनी पुन्हा ही लस घेऊ नये. असे आवाहन डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा शल्यचिकित्सक, धाराशिव यांनी केले आहे.

# मुरुम शहर पत्रकार संघाकडून महावितरण कर्मचाऱ्यांचा गौरव

## लाईनमन दिनी कर्तव्यनिष्ठ सेवेचा सन्मान



आरंभ मराठी । मुरुम

वीज सेवा अखंडित ठेवण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेचा गौरव करत मुरूम शहर पत्रकार संघाच्या वतीने लाईनमन दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (ता. ५) विशेष सत्कार करण्यात आला.

यात्रसंगी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना पारंपरिक फेटा बांधून शाल, पुष्पहार तसेच टेस्टर भेट देत त्यांचा सन्मान करण्यात आला. ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमुळेच नागरिकांचे दैनंदिन जीवन सुलभ होत असल्याचे मत पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी व्यक्त केले. अशा कर्मचाऱ्यांचा सन्मान होणे गरजेचे असून नागरिकांनीही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी महावितरणचे सहायक अभियंता यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नहिरपाशा मासूलदार, सचिव मोहन जाधव, सहसचिव अजिंक्य मुरूमकर, प्रसिद्धीप्रमुख प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांच्यासह महावितरणचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# भूम पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या पूजा ढगे तर उपसभापतीपदी प्रियांका रणबागूल यांची निवड

आरंभ मराठी । भूम

भूम पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या पूजा ढगे यांची तर उपसभापतीपदी वंचित बहुजन आघाडीच्या प्रियांका रणबागूल यांची निवड झाली. या निवडीत शिवसेनेने राजकीय डावपेच रचत बाजी मारली असून आमदार डॉ. तानाजी सावंत यांनी आपले राजकीय वर्चस्व सिद्ध केले. भूम पंचायत समितीची निवडणूक दहा गणांमध्ये झाली होती. त्यामध्ये दहा पैकी पाच सदस्य शिवसेनेचे विजयी झाले, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे चार सदस्य निवडून आले होते. तसेच वंचित बहुजन आघाडीचा एक उमेदवार विजयी झाल्यामुळे पंचायत समितीमध्ये दोन्ही बाजूंचे संख्याबळ पाच-पाच असे समसमान झाले होते. त्यामुळे सभापती व उपसभापती पदाची माळ



कोणाच्या गळ्यात पडणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. शुक्रवारी पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या निवड प्रक्रियेत शिवसेनेच्या पूजा ढगे यांनी सभापती पदासाठी अर्ज दाखल केला, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून बाळासाहेब खरवडे यांनी सभापती पदासाठी अर्ज सादर केला होता. तसेच उपसभापती पदासाठी वंचित बहुजन आघाडीच्या प्रियांका रणबागूल यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रदीप शेळके यांनी अर्ज दाखल केला होता. झालेल्या मतदानात शिवसेनेच्या उमेदवारांना सहा मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना चार मते मिळाली. प्रियांका रणबागूल यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली होती, मात्र शेवटच्या क्षणी शिवसेनेने त्यांना मतदान केल्यामुळे त्या उपसभापतीपदी विराजमान झाल्या. निवडीची घोषणा होताच पंचायत समितीच्या आवारात गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे नेते संजय गाढवे, भूम नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा संयोगिता गाढवे, बाळासाहेब पाटील तसेच वंचित आघाडीचे नेते प्रवीण रणबागूल यांच्यासह शेकडो शिवसैनिक व बहुजन वंचित आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नूतन सभापती व उपसभापतींचा सत्कार करण्यात आला.

आरंभ मराठी

## सभापतीपदी राजश्री वरपे, उपसभापतीपदी प्रणिता चव्हाण

# ईश्वर चिठ्ठीने ठरली कळंब पंचायत समितीची सत्ता

आरंभ मराठी । कळंब

कळंब पंचायत समितीच्या सत्तास्थापनेत अखेर नशीबाची चिठ्ठी निर्णायक ठरली. अत्यंत चुरशीच्या राजकीय घडामोडीनंतर शिवसेना (शिंदे गट) यांच्या सौ. राजश्री धनंजय वरपे यांची सभापतीपदी तर भाजपाच्या सौ. प्रणिता प्रणव चव्हाण यांची उपसभापतीपदी निवड झाली. दोन्ही पदांसाठी झालेल्या निवडीत समसमान संख्याबळामुळे अखेर चिमुकल्याच्या हातून नशीबाची चिठ्ठी काढण्यात आली आणि सत्तेची बाजू महायुतीच्या पारड्यात पडली. कळंब पंचायत समितीच्या १६ गणांसाठी झालेली निवडणूक सुरुवातीपासूनच अत्यंत चुरशीची ठरली होती. सभापती पद सर्वसाधारण प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असल्याने अनेक राजकीय समीकरणे बदलली. निकालात महायुती आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गट या दोन्ही बाजूंना प्रत्येकी आठ जागा मिळाल्याने सत्ता कोणाची याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.





भाजप-शिवसेना (शिंदे) महायुतीत भाजपाचे पाच तर शिंदे सेनेचे तीन सदस्य सभागृहात पोहोचले होते. तर दुसरीकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटानेही आठ जागा मिळवत सत्ता समीकरणे ताणली होती. त्यामुळे सभापती आणि उपसभापती पदासाठी झालेली निवडणूक थेट नशीब चिठ्ठीवर येऊन ठेपली. सभापती पदासाठी मस्सा खंडेश्वरी गटातून विजयी झालेल्या राजश्री धनंजय वरपे यांनी अर्ज दाखल केला होता, तर त्यांच्या विरोधात नायगाव गणातून विजयी झालेल्या उद्धव सेनेच्या सीमा टेकाळे मैदानात होत्या. दोन्ही बाजूंना समान मते पडल्याने अखेर चिमुकल्याच्या हातून काढलेल्या नशीब चिठ्ठीत वरपे यांच्या नावाची चिठ्ठी निघाली आणि सभापती पदावर त्यांची निवड निश्चित झाली. उपसभापती पदासाठी भाजपाच्या प्रणिता प्रणव चव्हाण आणि उद्धव सेनेचे मनोज घोगरे यांच्यात लढत झाली. येथेही समान संख्याबळामुळे नशीब चिठ्ठीचा मार्ग स्वीकारण्यात आला आणि योगायोगाने दुसऱ्यांदाही महायुतीच्याच पारड्यात विजय पडला. मंगरूळ गणातून विजयी झालेल्या प्रणिता चव्हाण यांच्या नावाची चिठ्ठी निघाल्याने त्या उपसभापतीपदी विराजमान झाल्या. दरम्यान, भाजपाचे संख्याबळ अधिक असतानाही सभापती पद शिंदे सेनेला देण्यात आल्याने विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे. यावेळी शिवसेना धाराशिव जिल्हाप्रमुख अजित पिंगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, शिवसेना तालुकाप्रमुख लक्ष्मीकांत हुलजुते, उपजिल्हाप्रमुख अनंत वाघमारे, भाजप तालुकाध्यक्ष अरुण चौधरी, दत्तात्रय साळुंखे, जिल्हा परिषद सदस्य अनंत लंगडे, प्रणव चव्हाण, मेघराज देशमुख, श्रीराम पवार यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनिर्वाचित सभापती राजश्री वरपे आणि उपसभापती प्रणिता चव्हाण यांनी कळंब तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.